# मुंबई अधिवेशन

## लाच मागणारे वन अधिकारी व कर्मचारी शासन सेवेतून निलंबीत

मुंबई (प्रतिनिधी) पनवेल येथील अवैध रक्तचंदन वाहतूक प्रकरणी लाच मागणाऱ्या वन अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून त्या सर्वांना शासन सेवेतून निलंबीत करण्यात आल्याची माहिती, राज्याचे वने मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी दिली आहे.आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दाखल केलेल्या तारांकित प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात ही माहिती देण्यात आली आहे.

रायगड जिल्हयातील पनवेल वन विभाग कार्यालयातील सहाय्यक वनरक्षक कृष्णा गोविंद अलुरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १३ डिसेंबर २०१३ रोजी एका कथित रक्तचंदन तस्करीच्या गुन्ह्यात राजेश पोखरकर यांना अटक केली होती. त्यानंतर ८ दिवस वनविभागाच्या सभागृहात डांबून ठेवून त्यांचा मानसिक, शारिरिक छळ सुरू करून त्यांच्या सुटकेसाठी कुटुंबियांकडून २ कोटी रूपयांची मागणी केली असल्याचे मार्च २०१४ मध्ये उघडकीस आले असून दि.४ जानेवारी रोजी जामिनावर सुटून आल्यानंतर राजेश पोखरकर यांनी सहाय्यक वनसंरक्षक कृष्णा अलुरकर आणि त्यांचे इतर सहकारी यांच्या विरोधात दि.२९ जानेवारी २०१४ रोजी या प्रकरणाबाबतची लेखी तक्रार करून मुख्य वनसंरक्षक ठाणे यांच्याकडे चौकशीची मागणी केली होती. याबाबत शासनाने केलेल्या चौकशी अंती दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली, अशीही विचारणा तारांकित प्रश्नाव्दारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

राज्याचे वने मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे की, डायरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजंन्स (डिआरआय) या केंद्र शासनाच्या यंत्रणेने अवैध रक्तचंदन वाहतूक प्रकरणी राजेश पोखरकर यांना दि.१२ डिसेंबर २०१३ रोजीच्या रात्री पकडून वन विभागाच्या ताब्यात दिल्यानंतर वन विभागाने दि.१३ डिसेंबर २०१३ रोजी पहाटे त्यांना रक्तचंदन अवैध वाहतुकीच्या गुन्हयात अटक केली.पोखरकर यांना पनवेल रौ.गु.नं. एम-११ /२०१३-१४मध्ये वन कोठडी मिळाल्याने त्यांना वन परिक्षेत्र कार्यालयाच्या शेजारी असलेल्या शासकीय सभागृहात कोठडीच्या कालावधीत चौकशीसाठी ठेवण्यात आले होते . या दरम्यान पोखरकर यांच्याकडे वन अधिकाऱ्यांनी खंडणी मागितल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले आहे. दि.४ जानेवारी रोजी जामिनावर सुटून आल्यानंतर राजेश पोखरकर यांनी सहाय्यक वनसंरक्षक कृष्णा अलुरकर आणि त्यांचे इतर सहकारी यांच्या विरोधात दि.२९ जानेवारी २०१४ रोजी या प्रकरणाबाबतची लेखी तक्रार करून मुख्य वनसंरक्षक ठाणे यांच्याकडे चौकशीची मागणी केली होती. या प्रकरणी त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने १४ अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द पनवेल पोलीस ठाण्यात गु.र.नं.१०३/२०१४ दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर १४ वन अधिकारी व कर्म चारी यांना शासन सेवेतून निलंबीत करण्यात आल्याचेही त्यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे.

## कासारभाट अवैध वाळू उत्खननाबाबत पोलीसात गुन्हा दाखल

मुंबई (प्रतिनिधी) पनवेल तालुक्यातील कासारभट, केळवणे व साई येथील अवैध वाळू उत्खननाबाबत केलेल्या कारवाई दरम्यान आढळून आलेली यंत्रसामुग्री नादुरूस्त करण्यात आली असून यासंदर्भात पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती लेखी उत्तराव्दारे राज्याचे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे. राज्यात वाळू उपशावर शासनाकडून बंदी घालण्यात आली असतानाही बेकायदा रेतीचे उत्खनन सुरू असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता. त्या प्रश्नाला उत्तर देताना ना.थोरात यांनी लेखी स्वरूपात माहिती दिली आहे.

राज्यात वाळू उपशावर बंदी घालण्यात आली असतानाही पनवेल तालुक्यातील कासारभाट खाडीत खारपाडा पुल ते कर्नाळा इंटरनॅशनल शाळेजवळील सिमादेवी मंदिराच्या खाली बेकायदा रेतीचे उत्खनन सुरू असल्याचे फेब्रुवारी २०१४ मध्ये उघडकीस आले असून केळवणे, साई आणि कासारभाट या खाडी किनाऱ्यावर पनवेलच्या तहसील विभागाने ४ मार्च रोजी वा त्या सुमारास धाड टाकून वाळू उपसा करण्यासाठी लागणारे तब्बल ३० लाख रूपये किंमतीचे साहित्य जप्त केले. त्याचबरोबर खेड तालुक्यातील सोनगाव व धामणदेवी या खाडीभागात गेले अनेक दिवस बिनधास्त व राजरोसपणे वाळू व्यावसायिक वाळू उत्खनन करीत असल्याने शासनाचा लाखो रूपयांचा बुडत असल्याने अवैध वाळू उत्खनन

प्रकरणाची शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई अधिवेशनात दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात विचारणा केली.

नामदार बाळासाहेब थोरात यांनी यावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, खेड तालुक्यातील धामणदेवी, सोनगाव येथील खाडी भागात उपविभागीय अधिकारी खेड व खेड तहसिलदार यांनी २५ मार्च २०१४ रोजी अचानक भेट देवून स्थानिक चौकशी केली असता त्या ठिकाणी वाळू उत्खनन होत असल्याचे आढळून आले नाही परंतु पनवेल तालुक्यातील कासारभाट येथील बंदर भागात महसूल व पोलीस प्रशासनाने अचानक तपासणी केली असता, रेतीचा अवैधपणे साठा करण्यासाठी कोंडया केल्याचे आढळून आले असून या कोंडया जेसीबीच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या. केळवणे, साई येथे रेतीचे अवैध उत्खनन करण्याकरिता वापरण्यात येणारी यंत्रसामग्री बेवारस अवस्थेत आढळून आली. ही यंत्रसामग्री खाडीबाहेर काढणे अशक्य असल्याने, त्याच ठिकाणी पंचासमक्ष नादुरूस्त करण्यात आली असून कासारभाट, केळवणे व साई येथील अवैध वाळू उत्खननाबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्याचबरोबर पोलीसांमार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

## शाळांना शुध्द पाणी पुरवठा करण्यासंदर्भात तातडीची उपाययोजना

मुंबई (प्रतिनिधी) सिंधुदुर्ग जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना पाणी पुरवठा करणाऱ्या १६११ विहिरीमधील पाणी नमुन्यांची जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत तपासणी केली असता बहुतांश पाणी नमुने दुषित आढळले असून या प्रकरणाची शासनाने केलेल्या चौकशीनुसार शाळांमध्ये शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी कोणती तातडीची उपाययोजना करण्यात आली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री दिलीप सोपल यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना पाणी पुरवठा करणाऱ्या १६११ विहिरीमधील नमुन्याची तपासणी जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत करण्यात आली होती त्यापैकी २२२ नमुने दुषित आढळले आहेत. संबंधित शाळेतील पाण्याचे निर्जतुकीकरण करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे शाळांना मेडिक्लोन (द्रवरूप क्लोरीन) पुरविण्यात आले व सदर शाळेतील पाण्याचे ओ.टी.परिक्षण करून ते पिण्यास योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

## अवैध वृक्षतोडीबाबत

मुंबई (प्रतिनिधी) अमरावती जिल्हयातील चांदूररेल्वे ग्रामीण भागात तसेच अकोला जिल्हयातील बार्शिटाकळी तालुक्यात अवैधरित्या वृक्षतोड होत असल्याचे एप्रिल २०१४ मध्ये उघडीकस आले असून शासनाने या प्रकरणाची चौकशी करून वृक्षतोड करणाऱ्या व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता.

राज्याचे वनेमंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, अमरावती वनविभागातील चांदूररेल्वे परिक्षेत्रात नगर परिषदेच्या हद्दी बाहेरील खाजगी क्षेत्रातील एक कडूनिम झाड अवैधरित्या तोडून व त्याची अवैधरित्या वाहतूक करून जयबजरंग सॉमिल चंदूररेल्वे येथे चिरान केलेले ४२ नग माल जप्त करण्यत आला. तसेच अकोला जिल्हयातील बार्शिटाकळी तालुक्यात अवैधपणे वृक्षतोड सुरू असल्याचे निदर्शनास आले नसून नियमित बिट गस्तीमध्ये आढळून आलेल्या अवैध वृक्षतोडीमध्ये एप्रिल २०१४ मध्ये साग व सागेत्तर २५ थुट तर मे २०१४ मध्ये साग व सागेत्तर ३२ थुट नुकसानी आढळून आलेले आहे. अमरावती चांदूररेल्वे प्रकरणी आरोपींविरूध्द वनअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अकोला जिल्हयातील बार्शीटाकळी तालुक्यातील प्रकरणात नियमक्षेत्र गस्तीमध्ये आढळून आलेल्या अवैध वृक्ष तोडीचे वनगुन्हे वेळोवेळी नोंदवून वनगुन्हयांचा शोध घेण्यात येत आहे.